16 FEB 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सॉफ्ट स्किल्समुळे सर्वोत्तम संधी

## डॉ. मोरे : फार्मसी कॉलेजांतर्फे सॉफ्ट स्किल्स फॉर एम्प्लॉयबिलिटी कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १५ : "नोकरी मिळविणे, जीवनात यशस्वी होण्यासाठी फक्त अभ्यासक्रमातून मिळणारे तांत्रिक ज्ञान पुरेसे नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे. सर्जनशीलता, प्रेरणा, भावनिक बुद्धिमत्ता, निर्णय प्रक्रिया, प्रभावी देहबोली, समस्यापरिहार कौशल्य, संघभावना असे सॉफ्ट स्किल्स ज्याच्याकडे आहेत, त्याला करिअरमधील सर्वोत्तम संधी उपलब्ध होतात," असे 'बीसीयूडी'चे संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी सांगितले.




कोल्हापूर : सॉफ्ट स्किल्स फॉर एम्प्लॉयबिलिटी कार्यशाळेचे उद्‌घाटन करताना प्रा. डॉ. डी. आर. मोरे, प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, डॉ. एस. जी. किल्लेदार, डॉ. जॉन डिसोझा आदी.

शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालयांतर्गत कोल्हापूर विभागातील फार्मसी महाविद्यालयांतर्फे सॉफ्ट स्किल्स फॉर एम्प्लॉयबिलीटी कार्यशाळा ताराराणी विद्यापीठातील डॉ. व्ही. टी. पाटील स्मृतिभवनात झाली. १७ फार्मसी महाविद्यालयातील ५०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले. भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोरे कॉलेज ऑफ फार्मसी, माने कॉलेज ऑफ फार्मसी, संत गजानन महाराज कॉलेज ऑफ फार्मसी, डांगे कॉलेज ऑफ फार्मसीने आयोजन केले.

डॉ. मोरे म्हणाले, "शासनही विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविण्यासाठी आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण देत आहे. अभ्यासक्रमात एम्प्लॉयबिलीटी स्किल्स हा विषय गरजेचा झाला आहे; कारण करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी पदवीबरोबर व्यक्तिमत्त्वाचाही कस लागत असतो. जुनी कौशल्ये कालबाह्य होण्याआधी नवीन गोष्टी शिकण्याची तयारी ठेवा." डॉ. डी. ए. भागवत, प्रा. झकीहुसेन तांबोळी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. जी. किल्लेदार, डॉ. जॉन डिसोझा यांनी आभार मानले. आनंद पाटील, संतोष ईंगोले, विनय गोसावी यांनी मुलाखत तंत्र, संवाद कौशल्य, बायोडाटा तयार करणे, व्यक्तिमत्त्व विकासावर मार्गदर्शन केले. फार्मसी अग्रणी महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. एच. एन. मोरे, सचिव डॉ. एस. जी. किल्लेदार, डॉ. डी. आर. जडगे उपस्थित होते.

16 FEB 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशस्वी जीवनासाठी सॉफ्ट स्कील महत्त्वाचे

## - डॉ. डी. आर. मोरे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** सर्जनशीलता, प्रेरणा, भावनिक बुद्धिमत्ता, निर्णयप्रक्रिया, प्रभावी देहबोली, समस्या परिहार कौशल्य, संघभावना असे सॉफ्ट स्कील्स ज्याच्याकडे असेल त्याला करिअरमधील सर्वोत्तम संधी उपलब्ध होतात. त्यामुळे यशस्वी जीवनासाठी सॉफ्ट स्कील्स महत्त्वाचे आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत कोल्हापूर विभागातील फार्मसी महाविद्यालयांच्या 'सॉफ्ट स्कील्स फॉर एम्प्लॉयबिलिटी' या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. डॉ. व्ही. टी. पाटील मेमोरियल हॉल, ताराराणी विद्यापीठ येथे ते बोलत होते.




**कोल्हापूर : कार्यशाळेचे उद्घाटन करताना शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे. सोबत प्राचार्य, डॉ. एच. एन. मोरे, डॉ. एस. जी. किल्लेदार, डॉ. जे. आय. डिसोझा, डॉ. डी. आर. जडगे, डॉ. आर. सी. डोईजड व डॉ. एम. एस. भाटिया.**

डॉ. मोरे म्हणाले, कुशल मनुष्यबळाची कमतरता असल्याची टीका उद्योग जगताकडून होत असते. शासनही पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांचे प्रशिक्षण देत आहे. अभ्यासक्रमात 'एम्प्लॉयबिलिटी स्कील्स' हा विषय गरजेचा झाला आहे. कारण करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी आपण घेतलेल्या पदवीबरोबरच आपल्या व्यक्तिमत्त्वाचाही कस लागत असतो. शैक्षणिक पात्रतेबरोबरच विविध स्वभावाच्या व्यक्तींबरोबर एकत्रित काम करता येणे, आपले विचार नेमकेपणाने मांडता येणे आवश्यक आहे.

मोरे म्हणाले, शिवाजी विद्यापीठामार्फत सन २००५ पासून अग्रणी महाविद्यालय योजना राबवली जाते. या योजनेचा मुख्य उद्देश विविध विद्याशाखानिहाय महाविद्यालयांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांच्या शिक्षण, संशोधन, कला, क्रीडा, सांकृतिक आदी क्षेत्रात सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहणे हा आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व फार्मसी महाविद्यालये यांची शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्याकरिता तसेच वाढत्या स्पर्धेत विद्यार्थी टिकून राहण्याकरिता कलागुणांना वाव देणारे विविध उपक्रम राबवले जातात.

कार्यशाळेत गॅब कन्सलटंट, ठाणे या संस्थेचे आनंद पाटील, संतोष इंगोले व विनय गोसावी हे प्रशिक्षक उपस्थित होते. इंटरव्ह्यू टेकनिक्स, संवाद कौशल्य, रिझ्युम रायटिंग व व्यक्तिमत्त्व विकास याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. तसेच प्रत्यक्ष विद्यार्थी सहभागातून प्रात्यक्षिक करून प्रशिक्षण देले. शेवटी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.

या कार्यशाळेस १७ फार्मसी महाविद्यालयांतील ५०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. डी. ए. भागवत व प्रा. झकीहुसेन तांबोळी यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. एस. जी. किल्लेदार व डॉ. जे. आय. डिसोझा यांनी केले. या कार्यशाळेचे आयोजन भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर (अग्रणी महाविद्यालय), तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी, वारणानगर, अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसी, पेठवडगाव, संत गजानन महाराज कॉलेज ऑफ फार्मसी, महागाव व अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ बी. फार्मसी, आष्टा यांनी केले. फार्मसी अग्रणी महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. एच. एन. मोरे, अग्रणी महाविद्यालयाचे सेक्रेटरी डॉ. एस. जी. किल्लेदार, डॉ. जे. आय. डिसोझा, डॉ. डी. आर. जडगे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व धन्वंतरी पूजन करून झाले.





कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सवातील जनरल चॅम्पियनशीपची ट्रॉफी विजेत्या मुंबई विद्यापीठाच्या संघास प्रदान करताना ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे, प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांच्यासह मान्यवर. दुसऱ्या छायाचित्रात शोभायात्रा स्पर्धेचे पारितोषिक स्वीकारताना शिवाजी विद्यापीठाचा विजेता संघ. (छाया : तय्यब अली)

# मुंबई विद्यापीठला जनरल चॅम्पियनशीप

## युवा महोत्सवाची सांगता ; शिवाजी विद्यापीठ स्पॉट फोटोग्राफीत प्रथम ; शोभायात्रा, मूकनाट्यात चौथा क्रमांक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

तरुणाईचा सळसळता उत्साह, ढोल-ताशांचा गजर अशा जल्लोषी वातावरणात आंतरविद्यापीठ युवा महोत्सवाची पारितोषिक वितरणाने शानदार सांगता झाली. मुंबई विद्यापीठाने सर्वच कलाप्रकारात बाजी मारून जनरल चॅम्पियनशीपचे मानकरी ठरले. शिवाजी विद्यापीठाने स्पॉट फोटोग्राफी स्पर्धेत प्रथम व शोथायात्रा, मूकनाट्य स्पर्धेत चौथ्या क्रमांक मिळविला. नागपूर, सोलापूर, पुणे, औरंगाबाद विद्यापीठांच्या संघांनी दमदार कामगिरीच्या जोरावर पारितोषिके मिळविली.

शिवाजी विद्यापीठात ३२ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. चार दिवस देशभरातील ८२ विद्यापीठांतून आलेल्या हजारो युवा कलाकरांनी वैविध्यपूर्ण कलाविष्काराबरोबर अनोख्या

अभिनेते सयाजी शिंदे, जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी, प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे, असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजचे निरीक्षक एस. के. शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. पारितोषिक समारंभापूर्वी वनस्थळी विद्यापीठ राजस्थानच्या कलाकारांनीपारंपरिकनृत्य, आंध्रप्रदेश विद्यापीठाच्या विद्यार्थिनी कलाकारांनी फोक ऑर्केस्ट्रा, पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाने समूह गीत सादर करून टाळ्या-शिट्टयांची दाद मिळविली.

विद्यार्थी कल्याण मंडळाचे माजी संचालक प्रा. डॉ. डी. के. गायकवाड यांनी २५ कला प्रकारातील विजेत्या संघाच्या नावांची घोषणा केली. मुंबई विद्यापीठाने विविध कलाकारांत पारितोषिके मिळवित जनरल चॅम्पियनशीप मिळविली. नागपूरचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ उपविजेते ठरले. गुरुनानक देव युनिव्हर्सिटी, अमृतसर (तृतीय),

युवा महोत्सवातील पारितोषिकांची घोषणा होत असताना तरुणांचा जल्लोष टिपेला पोहोचला. पारितोषिके जाहीर झाल्यानंतर ढोल-ताशांच्या गजर करीत युवा कलाकरांनी जल्लोष केला. विजेत्या संघाच्या कलाकारांनी संघाचे प्रशिक्षक, शिक्षकांना खांद्यावर उचलून घोषणाबाजी केली. संघातील इतर सहकारी, मित्रांना शुभेच्छा दिल्या. युवा महोत्सवात चांगले सादरीकरण करूनही पारितोषिक न मिळाल्याने कलाकारांच्या चेहऱ्यावर नाराजी होती. काही कलाकारांना आनंदाश्रू आवरता आले नाहीत.

प्रदेशच्या कृष्णा युनिव्हर्सिटीने प्रथम क्रमांक पटकाविला. गुवाहाटी युनिव्हर्सिटी (द्वितीय), कुरुक्षेत्र युनिव्हर्सिटी (तृतीय), शिवाजी विद्यापीठ आणि म्हैसूर युनिव्हर्सिटीस चौथा क्रमांक विभागून देण्यात आला. संगीत- गुरुनानक देव युनिव्हर्सिटी अमृतसर, नृत्य- मणिपूर युनिव्हर्सिटी, लिटररी- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज युनिव्हर्सिटी नागपूर, थिएटर- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, फाईन आर्टस्- मुंबई विद्यापीठाने चॅम्पियनशीप मिळविली.

मुंबई विद्यापीठ (प्रथम); क्लासिकल इन्स्ट्रूमेंटल सोलो- (सूरवाद्य) - भारती विद्यापीठ पुणे (द्वितीय), स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठ नांदेड (तृतीय).

**क्लासिकल इन्स्ट्रूमेंटल सोलो (तालवाद्य) :** भारती विद्यापीठ पुणे (प्रथम), स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठ नांदेड (द्वितीय); लाईट व्होकल (इंडियन)- एसएनडीटी महिला विद्यापीठ मुंबई, भारती विद्यापीठ पुणे (प्रथम), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (तृतीय); वेस्टर्न व्होकल सोलो- मुंबई विद्यापीठ (द्वितीय), राष्ट्रसंत

एसएनडीटी महिला विद्यापीठ मुंबई (प्रथम), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर (द्वितीय); ग्रुप सॉंग (वेस्टर्न)- मुंबई विद्यापीठ (द्वितीय), एसएनडीटी महिला विद्यापीठ मुंबई (तृतीय).

**फोक ऑर्केस्ट्रा :** मुंबई विद्यापीठ (प्रथम); राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर (तृतीय); फोक/ट्राईबल डान्स- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर (द्वितीय).

**क्लासिकल डान्स :** भारती विद्यापीठ पुणे (प्रथम), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर (चौथा), इलोकेशन- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर (द्वितीय); डिबेट - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर (द्वितीय); वन अॅक्ट प्ले- मुंबई विद्यापीठ (तृतीय), संत गाडगेबाबा, अमरावती युनिव्हर्सिटी अमरावती (चौथा); स्कीट - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर (चौथा).

**मिमिक्री :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (द्वितीय), संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती (चौथा); ऑन दि स्पॉट पेंटिंग- स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठ नांदेड, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (चौथा); कोलाज - मुंबई विद्यापीठ (प्रथम), राष्ट्रसंत तुकडोजी महराज विद्यापीठ नागपूर (द्वितीय).

**पोस्टर मेकिंग :** मुंबई विद्यापीठ (प्रथम), सोलापूर विद्यापीठ (तृतीय); क्ले मॉडेलिंग- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर (प्रथम), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद (द्वितीय), एसएनडीटी महिला विद्यापीठ मुंबई (तृतीय).

**कार्टूनिंग :** मुंबई विद्यापीठ (तृतीय), संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती (चौथा); स्पॉटफोटोग्राफी -

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2017
सकाळ

अवतीभवती



कोल्हापूर : धारवाड येथे झालेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरात 'स्कीट'मध्ये मिळविलेल्या पारितोषिकासह विद्यार्थी.

# राष्ट्रीय एकात्मता शिबिर 'स्कीट'मध्ये शिवाजी विद्यापीठास प्रथम क्रमांक

कोल्हापूर, ता. १५ : धारवाड येथील कर्नाटक विद्यापीठात झालेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरात (एनआयसी) 'स्कीट' या सांस्कृतिक कला प्रकारामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने प्रथम क्रमांक पटकाविला. शिबिरात विद्यापीठाच्या संघाने मूकनाट्य, लावणी, पहाटगीते व ओव्या सादर केल्या. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मापासून ते राज्याभिषेक सोहळ्यापर्यंत महत्त्वाचे व प्रेरणादायी प्रसंग विद्यापीठाने सादर केले होते. त्यास उपस्थितांची दाद मिळालीच. शिवाय प्रथम क्रमांकानेही गौरविण्यात आले. प्रियांका पाटील, पियूषा निडगुंदे, ज्योती कोंपले, सारिका गायकवाड, अमृता भंडारी, रत्नदीप देशमुख, सोमेश्वर कासे, मनीष करपे, संतोष पवार, प्रभाकर वाघ व संघप्रमुख प्रा. उत्तम पाटील यांनी विद्यापीठातर्फे शिबिरात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा. डॉ. डी. के. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी संग्राम मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2017
लोकमत

# 'उच्च शिक्षणातील परीक्षा सुधार'वर विद्यापीठात आज राष्ट्रीय परिसंवाद

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभाग व परीक्षा विभाग यांच्यातर्फे आज, गुरुवारी मानव्यशास्त्र सभागृहात 'उच्च शिक्षणातील परीक्षा सुधार' या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या परिसंवादाचे उद्घाटन सकाळी १०.३० वाजता कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते होईल. यावेळी परीक्षा नियंत्रक महेश काकडे मार्गदर्शन करतील.

उद्या, शुक्रवारपर्यंत चालणाऱ्या परिसंवादासाठी १२० हून अधिक संलग्नित महाविद्यालये व अधिविभागांमधील शिक्षक प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. या परिसंवादात प्रत्येक सत्रात गटकार्य घेतले जाणार आहे.

सहा सत्रांमध्ये होणाऱ्या या परिसंवादात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागातील डॉ. एम. एम. उपलाने, डॉ. एम. एस. पद्मिनी, डॉ. के. बी. पाटील, डॉ. ललित पवार हे मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2017
महाराष्ट्र टाईम्स

## परिसंवाद आजपासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात गुरुवारपासून (ता. १६) 'उच्च शिक्षणातील परीक्षा सुधार' या विषयावर राष्ट्रीय परिसंवाद होणार आहे. मानव्यशास्त्र विभागाच्या सभागृहात सकाळी साडेदहा वाजता परिसंवादाचे उदघाटन कुलसचिव विलास नांदवडेकर यांच्या हस्ते व परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांच्या उपस्थितीत होणार आहे. परिसंवादामध्ये डॉ. एम. एम. उपलाने, डॉ. एम. एस. पद्मिनी, डॉ. के. बी. पाटील, डॉ. ललित पवार मार्गदर्शन करणार आहेत. परिसंवादाचे संयोजन शिक्षणशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. एस. पाटणकर, परिसंवाद संचालक डॉ. सी. पी. सोनकांबळे व सहसंचालक डॉ. जी. एस. पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2017
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात उद्या संशोधन परिषद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामध्ये दि. १७ व १८ रोजी दोनदिवसीय आंतरशाखीय इंटरडिसिप्लिनरी संशोधन परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

या परिषदेमध्ये अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रातील मेकॅनिकल व एनर्जी, इलेक्ट्रॉनिक्स व कम्युनिकेशन, कॉम्प्युटर सायन्स व तंत्रज्ञान, सिव्हिल व एन्व्हायर्न्मेंट, केमिकल व फूड तंत्रज्ञान आंतरशाखीय संशोधन या विषयावर १०८ संशोधन निबंध प्राप्त झाले असून, त्यांपैकी उत्कृष्ट ४० संशोधन निबंध सादर होणार आहेत.

परिषदेच्या उद्घाटनासाठी गुजरात येथील सन फार्माचे सीनिअर जनरल मॅनेजर गिरीश भुंजे प्रमुख पाहुणे म्हणून तसेच इन्स्ट्रो टेक्निकल सर्व्हिसस प्रा. लि.चे सॅम एस. आणि शेल इराक पेट्रोलियम डेव्हलपमेंटचे विजय पाटील हे पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन सचिव प्रदीप भास्कर व तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी केले आहे. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2017
महाराष्ट्र टाईम्स

## विद्यापीठात उद्या संशोधन परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातर्फे शुक्रवारपासून (ता. १७) दोन दिवसीय आंतरशाखीय इंटरडिसीप्लिनरी संशोधन परिषद होणार आहे. परिषदेमध्ये अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रातील मेकॅनिकल व एनर्जी, इलेक्ट्रॉनिक्स व कम्युनिकेशन, कॉम्प्युटर सायन्स व तंत्रज्ञान, सिव्हिल व एनव्हायरमेंटल, केमिकल व फूड तंत्रज्ञान या आंतरशाखीय संशोधन विषयावर १०८ संशोधन निबंध प्राप्त झाले आहेत. त्यापैकी उत्कृष्ट ४० संशोधन निबंध सहा सत्रामध्ये सादर होणार आहेत. परिषदेच्या उद्घाटन समारंभास गुजरातच्या सन फार्माचे सिनियर जनरल मॅनेजर गिरीश भुंजे, एस. सॅम व इराक पेट्रोलियम डेव्हलपमेंटचे विजय पाटील उपस्थित राहणार आहेत. परिषदेचे संयोजन प्रदीप भास्कर व तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2017
पुण्यनगरी

# विद्यापीठात आंतरशाखीय संशोधन परिषदेचे आयोजन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामध्ये दि. १७ व १८ रोजी दोन दिवसीय आंतरशाखीय इंटर डिसीप्लिनरी संशोधन परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेमध्ये अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रातील मेकॅनिकल व एनर्जी, इलेक्ट्रॉनिक्स व कम्युनिकेशन, कॉम्प्युटर सायन्स व तंत्रज्ञान, सिव्हील व एनव्हायरमेंट, केमिकल व फुड तंत्रज्ञान आंतरशाखीय संशोधन या विषयावर १०८ संशोधन निबंध प्राप्त झाले असून त्यापैकी उत्कृष्ट ४० संशोधन निबंध ६ सत्रांमध्ये सादर होणार आहेत.

परिषदेच्या उद्‌घाटनासाठी गुजरातच्या सन फार्मा कंपनीची सिनियर जनरल मॅनेजर गिरीश भुंजे हे प्रमुख पाहुणे म्हणुन व तसेच इन्स्ट्रो टेक्नीकल सर्व्हिसेस प्रा. लि.चे सॅम. एस आणि शेल इराक पेट्रोलियम डेव्हलपमेंटचे विजय पाटील यांची प्रमुख उपस्थीती असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2017
लोकमत

## विद्यापीठात उद्या व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यासकेंद्रामार्फत उद्या, शुक्रवारी केंद्राच्या सभागृहात सकाळी १० वाजता व्याख्यानाचे आयोजन केले आहे. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. संजय सोनवणी हे 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : एक विचार' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

16 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Times of India

# Modi script certificate course starts today

**Kolhapur:** Chhatrapati Shahu Maharaj Maratha history study centre at Shivaji University, Kolhapur (SUK) is offering a two-week long certificate course on Modi lipi to start on Thursday and will end on March 4. Modi lipi is a six century old script which was used in writing Marathi then. An SUK circular stated that the course will be useful for students of history department. Researchers working on the documents in Maratha era can also apply for the course.

According to the SUK officials experts from various universities have been invited for the course. An SUK official said, " We are expecting a better response this year. The course is open for interested candidates and a nominal fee will be charged for the same. The course will be conducted from 3:30pm to 5:30pm." TNN

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2017
लोकमत

# तंत्रज्ञान अधिविभाग कबड्डीमध्ये अजिंक्य

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत अग्रणी महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत अंतिम सामन्यात विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग संघाने संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (गडहिंग्लज) संघावर २०-१८ अशा फरकाने मात करीत अजिंक्यपद पटकाविले.

नाणेफेक जिंकून तंत्रज्ञान अधिविभागाच्या संघाने प्रथम चढाई करण्याचा निर्णय घेतला. मध्यंतरापर्यंत अधिविभाग संघाने ७ गुणांची बढत घेतली होती. मध्यंतरानंतर १३-६ अशी गुणसंख्या होती. प्रत्युत्तरादाखल खेळताना तंत्रज्ञान अधिविभाग संघाने दोन गुणांची बढत घेऊन विजय मिळविला. त्यामध्ये अजय राठोड (कर्णधार), अजित काळे, अभिजित खाडे, ओमकार घडसिंग, आशिष मगदूम, शुभम माळी, आदित्य कोळेकर, अर्जुन काळे, ओंकार हेबाळे, ओमकार मोरे, संदीप माळी आणि मयूर कुदाळे या खेळाडूंनी चिवट झुंज देत विजय मिळविला. (प्रतिनिधी)